महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
शासकीय मध्यवर्ती इमारत ॲनी बेझेंट मार्ग पुणे-४११००१

w'site : www.mahdoesecondary.com
e-mail : docsecondary@gmail.com
Phone : (020) 245 30396 / 32491
31396 / 36463


क्र. उच्च माध्य-२४२/शालार्थ 19/ 6606

दिनांक : 14/1/2019

25 JAN 2019

प्रती,
विभागीय शिक्षण उपसंचालक
विभाग पुणे

विषय : कन्नड अल्पसंख्याक भाषेचा दर्जा प्राप्त करून रोष्टर डावलण्याचा प्रयत्न करून ख-या अल्पसंख्याक विदयार्थ्यांना न्याय मिळवून देणेबाबत .

संदर्भः श्री महेश पाटील, जुळे सोलापूर यांचा अर्ज दि . २५/१०/२०१८

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री महेश पाटील यांनी दाखल केलेल्या संलग्न अर्जाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे .

अर्जात नमूद मुद्दयांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून मुद्देनिहाय चौकशी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट आवश्यक दस्तऐवज पुराव्यासह या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा .

( सुनिता जगदाळे )
शिक्षण उपसंचालक
(माध्यमिक व उच्चमाध्यमिक)

Scanned by CamScanner

श्री. महेश पाटील,

जुळे सोलापूर, सोलापूर

दिनांक :- २५/१०/२०१८.

21 NOV 2018
29 e30
आवक क्रमांक.......
शाखा.......

प्रति,

मा. शिक्षण संचालक,

(माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे

विषय:-१) कन्नड अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा प्राप्त करुन रोष्टर डावलण्याचा प्रयत्न करुन ख-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना न्याय मिळवुन देणेबाबत...

२) सदर कनिष्ठ महाविद्यालयात भरती करण्यात आलेल्या १८ शिक्षण सेवकांचे नावे शालार्थ मध्ये न समाविष्ट करणेबाबत

३) कन्नड भाषेचा अपसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत

मा.महोदय,

उपरोक्त विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, आपल्या अधिपत्त्याखालील असलेल्या सोलापूर जिल्हयातील संगमेश्वर महाविद्यालय, सोलपूर या कनिष्ठ महाविद्यालयास कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झालेला आहे. परंतु सदर कनिष्ठ महाविद्यालयात सन २०१३-१४ पासून प्रत्यक्ष प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची मातृभाषा ही मराठी आहे, बोली भाषा ही कन्नड आहे व तसेच त्यांच्या इ.१०वी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर मातृभाषा मराठी असा उल्लेख आहे, तरी याबाबत आपण शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ते २०१८-१९ या कालावधीतील जनरल रजिष्टर , दाखले तपासणी करावीत व बोगस अल्पसंख्यांक प्राप्त करुन फक्त बिंदुनामावली डावल्याचा प्रयत्न संबधित संस्थेने केलेला आहे. तरी आपणांस नम्र विनंती की सदर कनिष्ठ महाविद्यालयातील समक्ष तपासणी करुन त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करुन कारवाई करावी.

शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ मधील मद्दा क्र-७ मधील (IV) अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त अनुदानित/विना अनुदानित, डीएड, बीएड, व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक संस्थानी सलग तीन शैक्षणिक वर्षात अल्पसंख्यांक कोटयात उपलब्ध असलेल्या ५० टक्के/५१ टक्के जागाच्या बदल्यात अल्प प्रमाणात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले तर, अशा शैक्षणिक संस्थांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे नमुद आहे, त्यामुळे आपण तात्काळ सदर कनिष्ठ महाविद्यालयाची त्रयस्थ समितीमार्फत तपासणी करुन संबधित संस्थेचा अल्पसंख्यांक दर्जा कादुन घेण्यात यावा. व मागासवर्ग अनुशेषाप्रमाणे भरती प्रक्रिया राबवुन नव्याने नियुक्त्या करण्याबाबत आदेश करावेत ही विनंती.

संगमेश्वर महाविद्यालय, सोलपूर या कनिष्ठ महाविद्यालयातील १८ शिक्षण सेवकांचे शालार्थ प्रणालीमध्ये नावे समाविष्ट करुन नयेत. त्याच प्रमाणे न्यावाने भरती केलेल्या शिक्षकांना मान्यता देण्यात येऊ

Scanned by CamScanner

नये. याउपर आपणाकडून १८ शिक्षण सेवकांचे नावे शालार्थ प्रणालीत समाविष्ट झाल्यास याबाबत आपली तक्रार अल्पसंख्यांक आयोगाकडे दाद मागण्यात येईल.

संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांनी कन्नड भाषेचे बोगस विद्यार्थी दाखवुन अल्पसंख्यांक आयोगाकडून देण्यात येणा-या शिष्यवृत्ती रक्कमेची अफरातफर केलेली आहे. याबाबत सुध्दा त्रयस्थ समिती मार्फत तात्काळ तपासणी करावी. कारण जे विद्यार्थी अल्पसंख्यांक नसुन संबधित कनिष्ठ महाविद्यालयाने इतर भाषेच्या विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक दाखविले आहे अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. याची देखील तात्काळ त्रयस्थ समिती मार्फत तपासणी करावी ही विनंती .

सोबत शासन निर्णय दिनांक २७.०५.२०१३

आपला विश्वासू,

सही/-

महेश पाटील, जुळे सोलापूर

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर**

१) मा.अल्पसंख्यांक अयोग, नवी दिल्ली, भारत सरकार
२) मा. अनुसूचित जाती-जमाती आयोग नवी दिल्ली, भारत सरकार
३) मा. विनोदजी तावडे, मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे-१
५) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-१
६) मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे-१

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय
## (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
## महाराष्ट्र राज्य

मध्यवर्ती इमारत, ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१

w'site : education.maharashtra.gov.in
e-mail : doehighersec@gmail.com
Phone : (020) 26120361


जा.क्र. उच्च माध्य-२४२/२०१९/ 2922
दिनांक : २.०४.२०१९
02 APR 2019

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

**विषय:- १) कन्नड अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा प्राप्त करुन रोष्टर डावलण्याचा प्रयत्न करुन खऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणेबाबत.**
**२) सदर कनिष्ठ महाविद्यालयातील भरती करण्यात आलेल्या १८ शिक्षण सेवकांचे नांव शालार्थ प्रणालीमध्ये न समाविष्ट करणेबाबत.**
**३) कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत.**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक उच्च माध्य-२४२/शालार्थ १९/७७७ दि. १४.१.२०१९.
२) आपले पत्र क्रमांक शिउस/उमावि ४०२/पुवि/(संगमेश्वर)/१८/२६४० दि. २८.३.२०१९.

उपरोक्त विषयाचे संदर्भात संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयाकडे प्राप्त श्री महेश पाटील यांच्या तक्रारीचे संदर्भात सखोल चौकशी करुन मुद्देनिहाय चौकशी अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. परंतु आपण अद्यापही चौकशी अहवाल सादर केलेला नाही.

आपले उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये संगमेश्वर महाविद्याल, सोलापुर या कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त १८ शिक्षकांना आपल्याच कार्यालयाने वैयक्तीक मान्यता प्रदान करुन त्यांना शालार्थ प्रणालीमध्ये नांव समाविष्ठ करण्याकरिता प्रस्ताव या कार्यालयास पाठविलेला असतांनाही त्यांना शालार्थ क्रमांक देण्यात येऊ नये असे कळविलेले आहे. तक्रार दिनांक २५.१०.२०१८ ची असतांना आपण त्याबाबत चौकशी न करतांच दिनांक ३०.१०.२०१८ ला शालार्थ बाबत प्रस्ताव का सादर केला. प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांना शालार्थ क्रमांक न देण्याबाबत नमुद करणे हे नियमानुसार दिसुन येत नाही. यावरुन आपल्या कार्यालयाने दिलेल्या मान्यतेबाबत आपणच साशंक असल्याचे दिसुन येते.

जर आपल्या कार्यालयाने दिलेल्या मान्यता हया चुकीच्या दिल्या आहे असे आपणास वाटत असेल तर त्यांचे शालार्थ प्रणालीमध्ये नांव नोंदविण्याकरिता प्रस्ताव या कार्यालयाकडे का सादर केला याबाबतचा खुलासा हे पत्र मिळाल्यापासुन तीन दिवसात सादर करण्यात यावा.

आपल्या विभागात अल्पसंख्यांक सर्व संस्थांच्या प्रमाणपत्रांची शाळानिहाय चौकशी करुन किती संस्थांनी चुकीचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र प्राप्त केले व ती रद्द करण्याबाबत आपण आजपर्यंत काय कार्यवाही केली याबाबतचाही अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(गंगाधर म्हमाणे)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्चमाध्यमिक)

**प्रत,** १) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापुर यांना सुचित करण्यात येते की, वरिष्ठ कार्यालयाने तपासणीकरिता पाठविलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना योग्य सहकार्य करावे. व त्यांनी मागविलेली माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावी.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/उमावि४०२/पुवि/(संगमेश्वर)/१८/२६४०
दिनांक- 28 MAR 2019

प्रति,

मा. शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**विषय:-१) कन्नड अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा प्राप्त करुन रोष्टर डावलण्याचा प्रयत्न करुन ख-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणेबाबत**
**२) सदर कनिष्ठ महाविद्यालयातील भरती करण्यात आलेल्या १८ शिक्षण सेवकांचे नांवे शालार्थ प्रणालीमध्ये न समाविष्ट करणेबाबत**
**३) कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत..**

**संदर्भ:१) शासन निर्णय (अल्पसंख्यांक विभाग) क्रमांक अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दि.२७.०५.२०१३**
**२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४२/शालार्थ-१९/७७७ दि. २५.०१.२०१९.**
**३) या कार्यालयाचे पत्र दि.०४.०२.२०१९ व २०.०३.२०१९**
**४) प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.०९.०२.२०१९**
**५) प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.२६.०३.२०१९.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रानुसार सविनय सादर करण्यात येते की, संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर यांना कन्नड अल्पभाषिक दर्जा प्राप्त आहे. त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ते २०१८-१९ या कालावधीत प्रत्यक्ष प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी असून सुध्दा त्यांना ५१ टक्के अल्पसंख्यांक कोटयातुन प्रवेश देऊन शासनाची फसवणूक केलेली आहे. अल्पभाषिक प्रमाणपत्राचा वापर शिक्षक भरतीमध्ये फक्त बिंदुनामावली डावलण्यासाठी केला असल्याबाबत त्याचप्रमाणे कन्नड भाषेचे बोगस विद्यार्थी दाखवुन अल्पसंख्यांक विभागाकडून देण्यात येणा-या शिष्यवृत्तीची अफरातफर केली असल्याबाबत आपल्या पत्रानुसार मुद्देनिहाय चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल आवश्यक त्या दस्ताऐवज पुराव्यासह सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदर प्रकरणी या कार्यालयामार्फत दि.२६ व २७ मार्च २०१९ रोजी त्र्यस्थ समिती संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात तपासणीसाठी गेलेली होती. तपासणीसाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची मागणी समिती सदस्यांनी केली होती.

१) विषय मान्यता पत्र २) सन २०१३-१४ ते २०१८-१९ किरकोळ रजा नोंदवही व रजेचे अर्ज ३) सर्व अनुदानित विना अनुदानित शिक्षकांची सेवापुस्तके ४) हजेरीपत्रक २०१३-१४ ते २०१८-१९, ५) सन २०१३-१४ ते आज अखेर शाळा समितीची आणि पालक शिक्षक संघाच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त नोंदवही, ६) द्विलक्षीय अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रती व त्याप्रमाणे २०१३-१४ ते आज अखेर घातलेल्या वर्षनिहाय व विषय निहाय प्रवेश संख्या , ७) सन २०१३-१४ ते २०१७-१८ अखेर संच मान्यता प्रती , ८) विना अनुदानित तुकडीसाठी इ.११ वी व इ.१२ वी शाखा निहाय घेत असलेल्या फी चा तपशिल त्याचप्रमाणे फी वाढीबाबत पालक शिक्षकांच्या बैठकीचे इतिवृत्त, ९) सन २०१५-१६ ते आज अखेर आवक जावक नोंदवही

उपरोक्त नऊ (९) कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र प्राचार्य, उपप्राचार्य यांनी समितीस तपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेले नाहीत, सुमारे ०४ तास समिती सदस्य सदर कॉलेजमध्ये तपासणीसाठी उपस्थित होते, तरीसुध्दा सदरचे कागदपत्रे त्यांनी उपलब्ध करुन दिली नाहीत. याउपर आमची संस्था भाषिक (कन्नड) अल्पसंख्यांक मान्यता प्राप्त आहे, त्यामुळे आपणांस चौकशीचे अधिकार नाहीत, त्यामुळे आपणांवर कायदेशिर

Scanned by CamScanner

कारवाई करण्यात येईल अशा पत्राची प्रत त्यांनी समितीस दिली.  त्याचप्रमाणे त्यांनी समितीने मागणी केलेली कागदपत्रे पुढील १५ दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल असे कळविले.

त्यामुळे आपल्या उपरोक्त संदर्भिय पत्र क्र-२ नुसार चौकशी अहवाल सादर करू शकत नाहीत. त्यामुळे आपल्या कार्यालयाकडे शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करणेबाबत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर तात्पुरता स्थगित ठेवावे ही विनंती.

आपली विश्वासु,

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा.आयुक्त(शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.

Scanned by CamScanner

Accredited by NAAC with 'A' Grade

# SANGAMESHWAR COLLEGE

SOLAPUR - 413 001. (MAHARASHTRA)
email :- prin_sangameshwar@yahoo.com

Post Box No. 52
Estd. 1953
Phone: Office - 2315588
Prin. - 2316688
Lib. - 2315566
Fax No.: 0217-2315588

Ref. No.SC/2018-19/169

Date :- 9 / 2 /2019

To,
Mrs. Meenakshi Raut
I/C Deputy Director
Pune Division
Pune

Sub: 1. Taking Kannada linguistic minority certificate to avoid roster.
2. Not registering 18 Shikshan Sevek of Junior College names in Shalarth Pranali.
3. Cancellation of Kannada linguistic minority certificate immediately

Ref: Your Office letter dated 4th February 2019 to the Enquiry Committee Members.

R Madam,

This is with reference to your above cited letter addressed to Shri. Sunil Gaikwad, Assistant Education Deputy Supervisor, Pune Division, Shri. Subhash Mahajan, Senior Professor, District Education Sanstha, Panvel, and Shri. K. D. Bhujbal, Extension Officer, Pune Zilla Parishad, Pune, and setting up the enquiry committee on false, fabricated complaint given by Shri. Mahesh Patil without knowing the facts and the rights of Minority College such as the Sangameshwar College. The order of your office and committee set under is illegal and highly objectionable and without having jurisdiction of your office on Minority Colleges under prevailing provisions of the Constitution of India, Supreme Courts/High Courts Judgments and Acts.

We would also like to bring to your attention to your letters subject No. 3 stating that the to cancel Minority Certificate of the college.

At the outset we submit that Sangameshwar College, Solapur is a Kannada Linguistic Minority Educational Institutions covered under Article 29 and 30 (1) of the Constitution of India, wherein it is enshrined that minority can establish and administer educational institution of their choice.

9/2/19

शिक्षण ... कार्यालय
(माध्य व उच्च मा...) मध्यवर्ती इमारत
महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१.

कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे -१

Scanned by CamScanner

At the outset we submit that the Minority Status flows from Article 30 (1) of the Constitution of India and as such is a Constitutional right which cannot be taken away even by a law or Government Resolution nor the process of revoking such status can be initiated by a recommendation from your office.

The Trust/School fulfills all the requirements of Article 30 (1) i.e. Trust has been established and is being administered by Kannad Linguistic persons. It is a settled law as laid down by the Hon'able Supreme Court in the case of N Ammad Vs. Emjay School that when the Government declared the School as a Minority School/College it has recognized factual position that the School/College was established and is being administered by a Minority Community. The declaration is only an open acceptance of a legal character which should necessarily have existed antecedent to such declaration.

Without prejudice to the above it is submitted that the State government's Minority Development Department has on the basis of Documents submitted by us accepted and confirmed the Minority Status of Linguistic Minority by issuance of Minority Status recognition Certificate No. 285 dated 6.02.2015. The aforesaid Certificate was granted as per the conditions /parameters laid down vide GR dated 4th July 2008 which conditions/parameters are still being fulfilled/complied by us hence question of recommending cancellation of Minority Certificate does not arise at all.

The college has acquired minority certificate according to the Government of Maharashtra GR dated 4th July 2008 and fulfilled all the criteria required to get the certificate, therefore your charge on college stating that to avoid roster the institution has acquired minority certificate is false, without knowing the provisions of acts, and rights of minority. In fact college has never indulged in such kind of practices but protecting the rights of the minority as per the constitution.

That your enquiry letter states that from academic year 2013-14 till 2018-19 College has admitted students in minority quota of 51% whose mother tongue is Marathi, without prejudice to the above, it is submitted that the present letter is totally misconceived both on law and facts and the test applied by you to determine Minority status based on the number of students is totally misconceived and contrary to the various judgments of the Hon'ble Supreme Court as detailed herein below. It is pertinent to note that the number of Minority Students admitted in a Minority Institution is dependent on number of factors and no rigid formula can be applied in this behalf which aspect has been dealt with in detail in this reply.

1. Kerala Education Bill Case (AIR 1958 SC 956) – Minority for the purpose of Articles 29 and 30 of the Constitution of India would be determined by reference to the entire population of the state.

Scanned by CamScanner

2. Lily Kurian Vs. St. Levoine (AIR 1979 SC 52) – The state may regulate the exercise of the right to administration of minority educational institutions but has no power to impose restrictions which is destructive of the right.

3. St. Stephen's College Vs. University of Delhi (AIR 1992 SC 1630) – Minority aided educational institutions may preserve 50 percent seats for their community candidates and are entitled to give them preference in admission as it is necessary to maintain the minority character of institutions.

4. T.M.A. Pai Foundation Vs. State of Karnataka (AIR 2003 SC 355) – An aided minority educational institution would be entitled to have the right of admission of students belonging to the minority group.

5. P. A. Inamdar and others Vs. State of Maharashtra (AIR 2005 SC 3236) – State can't impose its reservation policy on minority and non-minority unaided private colleges, including professional colleges.

The Minority status is not given in the pretext of admission of minority students but it's a constitutional right of minority community whether religious or linguistic.

In view of the above it is clear that we are and continue to satisfy the test laid down by the Hon'ble Supreme Court for determination of Minority Status and further the number of students to be admitted in an Institution depends upon various factors i.e. local needs and the interest, need of the minority community both of which deserve paramount consideration, the population and educational needs of the area, percentage of students that will adequately serve the interest of the minority. It is not open to the state to prescribe the minimum number of minority students or conclude that there are less minority students as all the above factors are related and dependent on each other.

Your attention is also brought to the Government of Maharashtra's School Education department's GR No. RTE2013/PraKra20/Prashi-1, dated 31st December 2013, under which the Government of Maharashtra, Sports and Education Department has declared the Local Authority and assigned their duties in which nowhere schools covered under minority administration have been mentioned, hence, your office has no jurisdiction over our college. Therefore, your request for inspection and submission of documents shall not be entertained. The committee set up by you vide your letter dated 4th February 2019 is illegal; your officers shall not be allowed to trespassed in the college premises and to submit false and fabricated report. The college authority shall not tolerate such interference of any third person/s in its management and smooth functioning of the college.

Scanned by CamScanner

कारा
७

Also note that College reserves its right to file contempt petition or any appropriate suit in the Hon'ble Supreme Court or Bombay High Court against the Education Officer in person and against the department if continually harassed by them in spite of having knowledge that the college is Minority College.

Further we would like to know under which act you have set up this committee and why you have not given copy of the complaint of Shri. Mahesh Patil to the college.

**Therefore, the request for College enquiry/ inspection between 13th to 15th February 2019 shall not be entertained by the College; neither information will be supplied to your office. Please also note that your team will not be allowed to enter into college premises, if your team tried to enter in the college premises forcefully, college shall initiate legal action for trespass.**

Thanking you,

SANGAMESHWAR COLLEGE SOLAPUR

Yours sincerely,

Principal

Copy to:

1. The Commissioner Education, M.S. Pune
2. The Director, Education, M.S. Pune
3. The Education Officer, Secondary, Z.P. Pune.
4. Shri. Sunil Gaikwad, Assistant Education Deputy Supervisor, Pune Division.
5. Shri. Subhash Mahajan, Senior Professor, District Education Sanstha, Panvel.
6. Shri. K. D. Bhujbal, Extension Officer, Pune Zilla Parishad, Pune,
7. Shri. Milind More, Assistant Education Supervisor, Zilla Parishad, Solapur.

माध्यमिक विभाग
जिल्हा परिषद, पुणे

9/2/19

कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १

Scanned by CamScanner

Post Box No.:52
Estd.:1953
Phone: Office - 2315588
Prin. - 2316688
Lib. - 2315566
Fax No.: 0217- 2315588

Accredited by NAAC with 'A' Grade
**SANGAMESHWAR COLLEGE**
SOLAPUR - 413 001. (MAHARASHTRA)
email :- prin_sangameshwar@yahoo.com

Ref. No.SC/2018-19/१९४ Date :26/3 /2019

प्रति,
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे

विषय:- १.कन्नड अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा प्राप्त करुन रोस्टर डावलण्याचा प्रयत्न करुन ख-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणेबाबत
२. सदर महाविद्यालयातील भरती करण्यात आलेल्या १८ शिक्षण सेवकांचे नावे शालार्थ प्रणालीमध्ये न समाविष्ट करणेबाबत
३. कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत

संदर्भ:- दिनांक २६.३.२०१९ रोजी आपल्या कार्यालयातील सहका-यांची कॉलेजला भेट व मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक जि.प.सोलापूर यांचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भास अनुसरुन आपणास विनंती करतो की, आमची संस्था भाषिक अल्पसंख्यांक असून भारतीय घटनेच्या कलम ३०(१) मधील तरतुदीनुसार वरील विषयासंदर्भात दिनांक ९.२.२०१९ च्या पत्रान्वये आपल्या कार्यालयास कळवीले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनार्थ यासोबत पुन:श्च सादर करीत आहोत. मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक जि.प.सोलापूर यांनी नमूद केलेल्या पत्रातील दिनांक २०.३.२०१९ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तसेच आमच्या संस्थेसंदर्भात केलेल्या तक्रारीची प्रत देखील या कार्यालयास मिळालेली नाही. ते प्राप्त झाल्यानंतर दिनांक २६.३.२०१९ रोजी आपण मागणी केलेल्या कागदपत्रासंदर्भात पुढील १५ दिवसात पूर्तता करण्यात येईल.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

कळावे,

SANGAMESHWAR COLLEGE * SOLAPUR *

आपली विश्वासू,

प्राचार्य

प्रत मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक, जिल्हा परिषद सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर

सोबत - वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

O/C

Accredited by NAAC with 'A' Grade

# SANGAMESHWAR COLLEGE

SOLAPUR - 413 001. (MAHARASHTRA)

email :- prin_sangameshwar@yahoo.com

Post Box No.:52
Estd.:1953
Phone: Office - 2315588
Prin. - 2316688
Lib. - 2315566
Fax No.: 0217- 2315588

Ref. No.SC/2018-19/ 188 Date : 26/3/2019

प्रति,
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे

विषय:- १.कन्नड अल्पसंख्यांक भाषेचा दर्जा प्राप्त करुन रोस्टर डावलण्याचा प्रयत्न करुन ख-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणेबाबत

२. सदर महाविद्यालयातील भरती करण्यात आलेल्या १८ शिक्षण सेवकांचे नावे शालार्थ प्रणालीमध्ये न समाविष्ट करणेबाबत

३. कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत

संदर्भ:- दिनांक २६.३.२०१९ रोजी आपल्या कार्यालयातील सहका-यांची कॉलेजला भेट व मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक जि.प.सोलापूर यांचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भास अनुसरुन आपणास विनंती करतो की, आमची संस्था भाषिक अल्पसंख्यांक असून भारतीय घटनेच्या कलम ३०(१) मधील तरतुदीनुसार वरील विषयासंदर्भात दिनांक ९.२.२०१९ च्या पत्रान्वये आपल्या कार्यालयास कळवीले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनार्थ यासोबत पुन:श्च सादर करीत आहोत. मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक जि.प.सोलापूर यांनी नमूद केलेल्या पत्रातील दिनांक २०.३.२०१९ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तसेच आमच्या संस्थेसंदर्भात केलेल्या तक्रारीची प्रत देखील या कार्यालयास मिळालेली नाही. ते प्राप्त झाल्यानंतर दिनांक २६.३.२०१९ रोजी आपण मागणी केलेल्या कागदपत्रासंदर्भात पुढील १५ दिवसात पूर्तता करण्यात येईल.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

कळावे,

SANGAMESHWAR COLLEGE SOLAPUR

आपली विश्वासू,
[signature]
प्राचार्य

प्रत मा.सहा.शिक्षण उपनिरिक्षक, जिल्हा परिषद सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर

सोबत - वरीलप्रमाणे

आपल्या जा.क्र.१८८ दि २६-३-१९ चे पत्रामध्ये नमुद केलेल्या दि २०-३-१९ चे पत्र हे शाळेतील नियुक्तीच्या [illegible] सदर पत्र संस्थेला दाखविले तरी सुध्दा सदर पत्राची मागणी करुन रेकॉर्ड तपासणी साठी रेकॉर्ड दाखविण्यास असमर्थता दर्शविली ही बाब लक्षात घेऊन सदर पत्राची प्रत देण्यात येत आहे
[signature] 26/3/19

Scanned by CamScanner